RW/MUM/Utility shifting/2018-19/19683

# Government of India
# Ministry of road Transport & Highway
# (Regional Office Maharashtra, Goa, Daman& Diu)

Room No.508 & 509, Konkan Bhavan, 5th Floor, Sector-6, C.B.D, Belapur Navi Mumbai-400614

Date- 12/11/2018

## Invitation of Public Comments

**Subject: Rehabilitation & up-gradation to Two line with paved shoulder / 4 lanning configuration of wakan - Pali - Khopoli - road NH-548-A ( SH-93) connecting New NH ( SH88) MPEW AH47 ( NH4) and NH-66 ( NH-17) from Km, 0/000 to 40/600 , in the state of Maharashtra.-Proposal for laying water pipeline**

**CE,**MSRDC vide letter No. NH-2018/02/DE-7/C.R No. WPK-007/ENGG/7500 ,dated 22.10.2018. has submitted proposal for laying water pipeline on the work "Rehabilitation & up-gradation to Two line with paved shoulder / 4 lanning configuration of wakan - Pali - Khopoli - road NH-548-A ( SH-93) connecting New NH ( SH88) MPEW AH47 ( NH4) and NH-66 ( NH-17) from Km, 0/000 to 40/600 , in the state of Maharashtra".

2. As per guideline issued by Ministry vide letter no. RW/NH-33044/29/2015/S&R(R), dated 22.11.2016 according to which for cases, Highway Administrator will make in Ministry website the complete application for public comments and comments will be invited within 30 days from the day of uploading.

3. In view of above, the comments of the public on the above proposal may be invited to this office. The detailed proposal submitted by applicant may be uploaded at www.morth.nic.in.

Encl: As above

Yours faithfully

(Abhinav Patwa)
**Assistant Ex. Engineer**
**For Regional Officer**

Copy to:

1) CE,MSRDC,Bandra,Mumbai -for information.
2) Senior Technical Director, NIC Transport Bhawan MoRTH, New Delhi. -For uploading on Ministry's website.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग

# सहाय्यक अभियंता श्रेणी-१ यांचे कार्यालय सा.बां. उपविभाग सुधागड (पाली) पिन कोड - ४१० २०५

जा.क्र. सा.बां.उवि/सुधागड-पाली/ e32 दिनांकः : २८/१२/२०१६

प्रति,
मा.कार्यकारी अभियंता
सा. बा. विभाग, अलिबाग

विषयः- वाकण पाली खोपोली रा.मा.९३ कि.मी. १४/८०० मध्ये पाण्यासाठी बोर मारुन पाण्याची पाईप लाईन टाकण्याची परवानगी देणेबाबत...

संदर्भः- आपले कार्यालयीन पत्र क्र.अवि/रेचिशा/३४९९ दि. २७/०४/२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन लेक सिटी प्रोजेक्टसाठी त्यांच्या रस्त्याच्या पालीकडे असलेल्या स्वताच्या बोरवेल मधून कि.मी. १४/८०० मध्ये रस्त्याच्या बाजूने व रस्ताला बोर मारुन ( Crossing ) पाण्याची पाईप लाईन टाकण्याची परवानगी मागीतली आहे. सदर प्रस्ताव तयार करुण पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता सविनय सादर करणेत येत आहे.

अर्जदाराने पुढीलप्रमाणे रक्कम विभागीय कर्यालयात जमा करावी.

अ) रस्ता पुर्ववत करणे करीता येणारा खर्च रु.- **१,६५,०००/-**

ब) ५ वर्षांचे आगाऊ भाडे-- रु.- **५४,९१४/-**

अर्जदाराने रस्ता पुर्ववत करणे करीता बँक गॅरेंटी रु. १,६५,०००/- रक्कम विभागीय कर्यालयात जमा करावी.

## <u>अटी व शर्ती</u>

१) पाण्याची पाइप लाइन ज्या ठीकाणी रस्त्याना छेदून टाकण्याचे प्रस्तावित आहे त्या ठीकाणी Horizontal drilling करुन आर.सी.सी. Conduct pipe टाकून काम करणे.

२) पाण्याची पाइप लाइन टाकणेकरीता खोदकाम करताना उपयुक्त मुरुम, माती,खडी यासारखे गौण खनिज यावर सा.बां. विभागाची मालकी राहील, असे गौण खनिज योग्य प्रकारे साठवून ते कार्यकारी अभियंता यांचेकडे सुपुर्द करणेची जबाबदारी संबंधीत अभिकर्ता कंपनीची राहील.

३) खोदकाम चालू असताना रस्त्याच्या कडेची झाडे तोडणे अनिवार्य असल्यास अभिकर्ता कंपनीने सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी मिळवावी.

Recd on 29/6/17
checked putup as per MORTH latest Guidelines
(initials) 3016
DE (Sh. Salvi)

४) महाराष्ट्र सरकार व केंद्रीय भूतल परीवहन मंत्रालयाने भविष्यात नविन नियम, अटी व शर्ती प्रस्तूत केल्यास अभिकर्त्या कंपनीस बंधनकारक राहतील. तसेच भविष्यात रस्ता रुंदीकरणासाठी पाण्याची पाईप लाईन काढावयाची झाल्यास त्याचा खर्च संबंधीत कंपनीने करावा.

५) पाण्याची पाईप लाईन रस्त्याच्या पृष्ठ भागापासून १.५० मी. खाली टाकण्यात यावी..

६) कपनीव्दारे पाण्याची पाइप लाइन टाकण्याचे काम सुरू करण्यापुर्वी सबधीत कपनीने सा.बा. खात्यासी संपर्क साधावा व संबंधीत क्षेत्राच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली काम सूरु करावयाचे आहे.

७) रस्त्या खालून पाण्याची पाइप लाइन टाकण्याचे कामास सुरूवात करण्यापुर्वी कामाच्या ठीकाणापासून दोन्ही बाजूस १०० मी. अंतरावर सावधानतेच्य ईशाऱ्याचे फलक रिफ्लेक्टीव स्ट्रीपचा वापर करून लावण्यात यावेत. तसेच रात्रीच्या वेळी काम सूरू अथवा अपूर्ण राहील्यास माहीतगार तंत्रज्ञासह रात्रभर तेवत राहणारा लाल प्रकाश झोताचा दिवा लावण्याची वा तत्सम व्यवस्था कंपनीने करावी.

८) रस्त्याचा पृष्टभाग पाण्याची पाइप लाइन टाकणेसाठी खोदला असता मोकळा होऊन पोकळी निर्माण झालेल्या पाण्याची पाईप लाईन टाकलेल्या लाइन व्यतिरिक्त इतर सर्व भागामध्ये संबंधीत कंपनीने स्वखर्चाने सिमेंट कॉक्रीटीकरण अथवा तत्सम समांतर पातळीचे बांधकाम साहित्याने भराव करून रस्त्याच्या पृष्ठभागाची रीजीडीटी कायम ठेवायची आहे.

९) प्रस्तावात केलेल्या कामाव्यतीरिक्त इतर वाढीव काम करावयाचे झाल्यास सा.बां. खात्याची पूर्व परवानगी घेणे कंपनीस बंधनकारक आहे.

१०) पाण्याची पाइप लाइन टाकणेचे काम चालू असताना एखादा अपघात घडल्यास त्याची सपूर्ण जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील.

११) पाण्याची पाईप लाईन टाकणेचे काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या ठीकाणी सा.बां. खात्याच्या मालकीच्या जागेत संबंधीत कंपनीच्या मालकीचे किंवा ठेकेदाराच्या मालकीचे कोणतेही अतिरीक्त साहीत्य मशिनरी राहणार नाही याची दक्षता कंपनीने घ्यावी.

१२) कंपनीच्या मालमत्तेचे हानीपासून संरक्षण करण्याची हमी शासन देत नाही.

१३) सदर काम चालू करण्यापुर्वी ३० दिवस अगोदरच्या कालावधीमध्ये संबंधीत कंपनीने रस्त्याचा काटछेद नकाशा रस्त्याचा पृष्टभाग खोदण्यासाठी वापरात येणारी मशिनरी व तिची पध्दत तसेच खोदाईच्या कामासाठी व प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यासाठी लागणार कालावधी इत्यादीबाबतचा सविस्तर प्रस्ताव सा.बां. खात्याच्या सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करून पूर्ण मंजुरी घेणे आवश्यक व बंधनकारक आहे.

१४) सदरहू कंपनी स्वतःच्या खर्चाने रस्त्याखाली घातलेल्या पाण्याची पाईप लाईन देखभाल व दुरूस्ती करून ती योग्य स्थितीत ठेवतील आणि रस्त्याचा बाजुकडील जमिनीची पृष्टभागाचे किंवा शासनाच्या सा.बां. खात्याच्या मालमत्तेचे जे काही नुकसान होईल ते कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग किंवा त्यांचे प्रतिनिधि यांचे संपूर्णतः समाधान होईल अशाप्रकारे पूर्ववत दुरूस्ती करून व्यवस्थित करून द्यावे लागेल.

१५) करारातील कोणत्याही शर्तीचे संबंधीत कंपनीने पालन न केल्यास तीन महिने आगाऊ दिलेल्या नोटीसीची मुदत संपल्यावर जमिनीखालील पाण्याची पाईप लाईन काढून टाकण्यची कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांना मोकळीक असेल, आणि कार्यकारी अभियंता यांचेव्दारे करण्यात आलेल्या खर्चास संबंधीत कंपनी जबाबदार असेल.

१६) सदरहू पाण्याची पाईप लाईन टाकणेचे काम सुरू करण्यापुर्वी पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेली जमीन खचणे इ. सारखी भविष्यात घटना घडल्यास ती जमीन व रस्त्याचा पृष्टभाग सुस्थितीत पूर्ववत आणण्यासाठी भरावयाची रक्कम व बँक गॅरेंटी या कार्यालयास जमा करण्यात येईल.

१७) सदरहू कामास सुरूवात करण्यापुर्वी सा.बां. खात्याकडून घालून दिलेले सर्व अटी मान्य असल्याचा कायमस्वरुपी करारनामा रू.१००/- किंमतीच्या मुद्रांक शुल्कावर (दस्तऐवज) तयार करून त्यावर कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे समक्ष स्वाक्षरी करुन द्यावा. सदर करारनाम्याची मुदत फक्त ५ वर्षांचे कालावाधीसाठी विधीग्राहय राहील. तद्नंतर सदर करारनाम्याचे नुतनीकरण करणे कंपनीस बंधनकारक राहील.

१८) नेहमीप्रमाणे नकाशावर आरऔड्ब्लू लाल रगात दर्शविण्यात आलो आहे. पाण्याची पाइप लाईन जमिनीच्या पातळीच्या खाली नकाशावर दर्शविण्यात आल्याप्रमाणे १.५० मी. खोलीवर असावी.

१९) भविष्यात रस्ता रुंदीकरण करावा लागल्यास त्याबाबतचा कामाचा खर्च संबधीत कंपनीस करावा लागेल.

२०) सदर रस्त्याच्या लाबीमध्ये पाण्याची पाइप लाइन टाकताना सा.बा. खात्याची जमिन उपलब्ध नसल्यास इतर कोणाच्या हक्काची जमिन येत असल्यास त्याची स्वतंत्रपणे परवानगी घेणे आपणावर बंधनकारक राहील.

सोबतः- प्रस्ताव ५ प्रतीत

**सहाय्यक अभियंता श्रेणी-१**
**सा. बां. उपविभाग, सुधागड (पाली.)**

वाकण पाली खोपोली रा.मा.९३ कि.मी. १४/८०० मध्ये पाण्यासाठी बोर मारुन पाण्याची पाईप लाईन टाकण्याची परवानगी देणेबाबत...

अ) रस्ता खोदुन छेदून ( Crossing) . कि.मी. 14/800

रस्ता दुरुस्ती खर्च

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 x | 30.00 | x | 5500.00 | = | 165000.00 |
| | | | | | | 165000.00 |
| रस्ता पुर्ववत करणे करीता बँक गॅरेंटी रक्कम | | | | | = | 165000.00 |

5 वर्षांचे आगाऊ भाडे--

एका वर्षाचे भाडे-

जागेची कींमत ( दुय्यम निबंधक यांचेकडील सन 2016 चे दरावर आधारीत भिलपाडा, या गावाचे दर घेऊन)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | = | 2482.00 |
| | 30.00 | x | 1.00 | = | | 30.00 |
| जागेची कींमत = | 30.00 | x | 2482.00 = | | | 74460.00 |
| 1 वर्षाचे भाडे--= | 74460.00 | x | 14.75% | | = | 10982.85 |
| 5 वर्षाचे आगाऊ भाडे= | 5.00 | x | 10982.85 | | | 54914.25 |
| | | | | एकुण | = | 54914.00 |

सहाय्यक अभियंता श्रेणी-१

सा. बां. उपविभाग, सुधागड (पाली.)